Estd. 1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

**( दूरशिक्षण केंद्राकडील एम. ए. अर्थशास्त्र, एम. ए. इंग्रजी, एम. एस्सी. गणित, एम. कॉम. व्हॅल्युएशन ॲण्ड रिअल इस्टेट या अभ्यासक्रमाच्या सत्र 3 करीता परीक्षेस बसणा–या विद्यार्थ्यांच्यासाठी)**

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी 2020 मधील दूरशिक्षण केंद्राकडील एम. ए. अर्थशास्त्र, एम. ए. इंग्रजी, एम. एस्सी. गणित, एम. कॉम. व्हॅल्युएशन ॲण्ड रिअल इस्टेट या अभ्यासक्रमाच्या सत्र 3 करीता विहित प्रक्रियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर परीक्षेच्या आयोजनाबाबत अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार परीक्षांचे नियोजन पुढीलप्रमाणे करणेत येत आहे.

1. दूरशिक्षण केंद्राकडील एम. ए. अर्थशास्त्र, एम. ए. इंग्रजी, एम. एस्सी. गणित, एम. कॉम. व्हॅल्युएशन ॲण्ड रिअल इस्टेट या अभ्यासक्रमाच्या सत्र 3 च्या परीक्षा Online/Offline पध्दतीने महाविद्यालय /अधिविभाग/अभ्यासकेंद्र स्तरावर सुयोग्य पध्दतीने दि. 15 डिसेंबर, 2020 ते दि. 31 डिसेंबर, 2020 या कालावधीमध्ये होतील. (परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.)

2. सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विषम सत्राच्या परीक्षा 50 गुणांची, 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर होईल. तसेच सदर परीक्षेसाठी कमाल प्रश्नांची मर्यादा ज्या त्या अभ्यास मंडळाने यापूर्वीच्या उन्हाळी अंतिम सत्राच्या परीक्षा पध्दतीनुसार असेल.

3. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप खालीलप्रमाणे असून प्रत्येक प्रश्नाच्या खाली/समोर उत्तरासाठी जागा ठेवण्यात येईल.

   उदा. – प्रश्न ............................................................................................................ | योग्य पर्याय |

   A)-------------- B)-------------- C) -------------- D) --------------

4. उत्तरासाठी √ (टिकमार्क) न करता चौकटीमध्ये उत्तर लिहीण्यात यावे (उदा. A, B, C, D इत्यादी )

5. विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येईल.

6. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेत येईल.

7. कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल/सूचना सोबत जोडलेल्या असून त्यानुसार योग्य ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/391
दिनांकः– 27 नोव्हेंबर, 2020
प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र– पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी